बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – ७० । वार मंगळवार दि ०९ डिसेंबर २०२५ आरएनआय एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 70 TUESDAY 9 December 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# आ.संदीप क्षीरसागर हिवाळी अधिवेशनामध्ये बीड विधानसभेतील सार्वजनिक बांधकाम विभागातील रविंद्र तोंडे, चंद्रकांत बोराडे, अक्षय भागवतसह अन्य इंजिनियराचा भ्रष्टाचाराचा प्रश्न उपस्थित करतील का? बीडकराच्या नजरा आमदार संदीप क्षीरसागरांकडे?

सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

## बीड मतदार संघात दीडशे कोटी, सार्वजनिक बांधकाम विभागाचा नंगानाच आ.संदीप क्षीरसागर, गप्प का संबंधित भ्रष्टाचार बाहेर काढण्यावर ही थोडंसं बोलावं ?

बीड मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या रोड नाली पूल याची सत्य परिस्थिती पाहिली असेल, तर घटनास्थळावर बीड विधानसभेच्या आमदारांनी जाऊन रस्त्याची व कामाची पाहणी करत जनतेसमोर सत्य परिस्थिती मांडावी सार्वजनिक बांधकामाचा नंगानाच हे जनतेला त्यानंतर दिसून येईल आणि तीनही आमदार आ. संदीप क्षिरसागर हे याबाबत आवाज उठवतील का हे पाहणे गरजेचे आहे. महायुती सरकारच्या २०२३ ते २०२४ ते २०२५ याकाळात बीड जिल्ह्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कोट्यावधी पेक्षा जास्त निधी बीड मतदार संघात आला तो रवींद्र तोंडे चंद्रकांत बोराडे अक्षय भागवत यानी स्थानिक आमदार व महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या कार्यकर्त्यांना स्वतः:च्या फायद्यासाठी टक्केवारी मध्ये मी ती खर्च करत कोट्यावधी रुपये हे गुत्तेदाराच्या घशात घातले आणि आपली टक्केवारी रवींद्र तोडे चंद्रकांत बोराडे अक्षय भागवत सह अन्य इंजिनिअर लोकांनी लुटली ?सार्वजनिक बांधकाम विभाग चे मुख्य अभियंता रवींद्र तोंडे चंद्रकांत बोराडे, अक्षय भागवत सह अनेक इंजिनिअर यांनी अक्षरशा नंगानाच सार्वजनिक बांधकाम विभाग विक्रीला काढले का? दारूच्या नशेत तर्रर असलेला सार्वजनिक बांधकाम विभाग बीड चा उपविभागीय अभियंता चंद्रकात बोराडे अरेरावीला अनेकजन कंटाळले आहेत.

# पालकमंत्री अजितदादा बीडच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत दीडशे कोटींचा घोटाळा; एसआयटी स्थापन करण्याची बीडकरांची मागणी?

## सार्वजनिक बांधकाम विभागात १५० कोटी पेक्षा जास्त बिले बोराडे, तोंडेंनी नंगानाच करून बोगस पद्धतीने उचलले, कारवाई करून एसआयटी चौकशी लावणार का?

- हिवाळी अधिवेशनात बीडच्या सार्वजनिक विभागात दीडशे कोटींपेक्षा जास्त घोटाळा; कुणी प्रश्न उपस्थित करणार का अजित दादा तुम्ही पालकमंत्री तुमच्या कार्यकाळात घोटाळा झाला एसआयटी मार्फत चौकशी लावा सत्य बाहेर पडेल जनतेचा संतप्त सवाल?
- बीड तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयात होणारी रिपेरिंगच्या नावावरती चंद्रकांत बोराडे ज्युनिअर इंजिनिअरच्या माध्यमातून पैसे लुटले गुत्तेदारांना टक्केवारी देत स्वतः:च्या नातेवाईकाच्या नावाने बिल काढल्याची चर्चा?
- रवींद्र तोंडे, चंद्रकांत बोराडेंनी अक्षय भागवत सारख्या अनेक जूनियर इंजिनियरवर दबाव टाकत हाताशी धरून १५० कोटी पेक्षा जास्त रिपेरिंग व नवे जुने बिल उचलून गुत्तेदारांच्या माध्यमातून केला मोठा?
- अनेक कामांमध्ये बोगसगिरी उघड, नवे जुने पुलाची दुरुस्तीच्या नावावर कोट्यावधी रुपयाचा निधी चंद्रकांत बोराडे,रविंद्र तोंडेने ज्युनिअर इंजिनिअरच्या माध्यमातून काम न करताच हडप केला?
- बीड शहरातील अनेक कामांची चौकशी लावा शासकीय कार्यालयात नवी जुनी कामांची रिपेरिंग दाखवून कोट्यावधीची बोगस बिल उचलली; अजित तुम्ही तुम्ही बीडचे पालकमंत्री जनतेला उत्तर द्या जनतेचा सवाल?
- दोन महिन्यांमध्ये चंद्रकांत बोराडे रिटायर होणार माझं काय वाकडं कोण करतय त्याला जाऊन सांगा; चंद्रकांत बोराडेंची गुत्तेदार कर्मचारी त्रस्त? अनेक शासकीय कार्यालयातील बोगसगिरी पुढील अंकात?



बीड । आरंभ वृत्तसेवा

बीड सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये या अगोदर सुद्धा अनेक घोटाळे झालेले आहेत. अनेक संस्थांना गुत्तेदारांना बोगस बिले उचलून देण्यामध्ये बोराडे माहीर आहे. बोराडे हा वादग्रस्त अधिकारी असून त्याच्यावरती नियंत्रण असणारे रवींद्र तोंडे हे सुद्धा बोराडेच्या बोराडे च्या भ्रष्टाचारामध्ये सामील आहेत. अक्षय भागवत नावाचा इंजिनियर व त्यापेक्षा अनेक ज्युनिअर इंजिनिअर यांना जीई म्हणतात अशांना हाताशी धरत रवींद्र तोंडे चंद्रकांत बोराडे व भागवत यांनी बीड तालुक्यामध्ये जवळपास दीडशे कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी बोगस पद्धतीने उचलून दुरुस्ती रिपेरिंग व काम न करताच काही ठिकाणी बिल उचललेले आहेत.









१५० कोटी पेक्षा जास्त निधी तोंडे, बोराडे भागवत यांच्या कार्यकाळामध्ये वर्ग झालेला आहे. बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी या प्रकरणात एसआयटी दाखल करून सत्य बाहेर काढावे, गुन्हे दाखल करावे, असा संतप्त सवाल बीडच्या जनते कडून होत आहे. तक्रारदाराने तक्रार लिहून ठेवली पण तक्रारदारालाच नंतर मॅनेज केली आणि राजकीय दबाव आणून तक्रारदाराला मागे तक्रार घ्यायला




लावली, कारण तुकडे पाडून जर बोगस बीले उचलण्यामध्ये बोराडे माहेर आहेत. तर कोणत्या सामाजिक कार्यकर्त्याला व राजकीय नेत्यांना काम बोराडे कडून होत आहे. बोराडे हा दारूच्या नशेत तर असणारा अधिकारी आहे. हे सर्वांना माहीत आहे बोराडे चा नंगानाच हा बीडच्या पान २ वर...


## कामाचे तुकडे करून बोगस बिल?

राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ (नवीन क्र. ५२) सोलापूर औरंगाबाद या रस्त्याची बीड शहरातील सुटलेली लांबी प्रजिमा–७९ कि.मी. ३/७०० ते ६/८०० मध्ये वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे ता. बीड (भाग–१) कामाचे रू. ३०.०० लक्ष किंमतीत एकच प्रशासकीय मान्यता होती. तरी पण स्वतः:चा आर्थिक लाभ करून घेण्यासाठी सी.पी. बोराडे, अभियंता व अक्षय भागवत, ज्युनिअर इंजिनिअर यांनी या कामाचे तीन तुकडे करून बोगस बिल उचललेले आहे. या विषयाला अनुसरून बऱ्याच तक्रारी व स्थानिक वर्तमान पत्रात बातम्या आलेल्या आहेत. तरी पण आपले सार्वजनिक बांधकाम खात्यातील सी.पी. बोराडे व अक्षय भागवत, जी.ई. यांच्यावर कारवाई का करत नाही, अशा बोगस प्रकरणाशी संबंधीत अभियंता व जी.ई. अक्षय भागवत यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी तसेच या कामाशी संबंधीत सर्व कागदपत्र अजित पवार यांनी या कामांमध्ये एसआयटी चौकशी लावावी कारण अजित पवार हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री असले तरी बीडचे पालकमंत्री आहेत आणि बीडच्या जनतेने तोंडे ,बोराडे ,भागवत चा नंगानाच उघड्या डोळ्याने पाहिलेला आहे मग हा पालकमंत्री अजित पवार यांनाच दिसत नसेल का कामाचे तुकडे करण्याचा अधिकार नसतांना स्वतः:च्या फायद्यासाठी कामाचे तुकडे करून बोगस बिले उचलले हे सिध्द झाले आहे. करीता रवींद्र तोंडे अभियंता चंद्रकांत बोराडे बोराडे व जी.ई. अक्षय भागवत सह अनेक जूनियर इंजिनियर यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी,

# १० डिसेंबर – आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन

## मानवतेच्या प्रतिष्ठेची , स्वातंत्र्याची आणि न्यायाची न संपणारी ज्योत

मानवजातीचा सर्वात मोठा शोध कोणता ? शास्त्र म्हणतं – अग्नी . इतिहास म्हणतो – चाक . राजकारण म्हणतं – राज्यव्यवस्था . पण मानवता एकच उत्तर देते – अधिकार . माणूस माणूस म्हणून जगू शकतो याची पहिली अट म्हणजे त्याचे मूलभूत अधिकार सुरक्षित असणे . म्हणूनच प्रत्येक वर्षी १० डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन म्हणून साजरा केला जातो . हा दिवस केवळ स्मरणाचा नाही , तर चेतनेचा , विवेकाचा आणि परिवर्तनाच्या दिशेने चालण्याचा आहे . हा दिवस जगाला सांगतो – स्वातंत्र्य हे कृपा नसते ; ते हक्क असते . न्याय हा दान नाही ; तो अधिकार असतो . आणि समानता ही उपकाराची गोष्ट नाही ; ती मानवी जन्मसिद्ध प्रतिष्ठा आहे . मानवाधिकारांची सुरुवात : जगाला बदलणारा दस्तऐवज दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने अत्याचारांचे भयावह स्वरूप पाहिले . लाखो लोकांचा मृत्यू , अमानवी छळ , यातना आणि वंशहत्येच्या काळोखाने मानवजातीचे अंतर्मन हलले . यानंतर १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने मानवाधिकार सार्वत्रिक घोषणापत्र स्वीकारले . ३० कलमांचे हे घोषणापत्र म्हणजे मानवी संस्कृतीचे उज्ज्वल शिलालेख . जन्मतः स्वातंत्र्य , अभिव्यक्ती स्वातंत्र्य , जीवनाचा हक्क , न्याय मिळण्याचा अधिकार , शिक्षणाचा हक्क , सुरक्षित अस्तित्व – या सर्व अधिकारांनी जगाचा विचार बदलला . भारत आणि




मानवाधिकार : संविधानाचा आत्मा भारताचे संविधान हे जगातील सर्वात प्रगत व मानवी मूल्यांनी अधोरेखित दस्तऐवजांपैकी एक आहे . स्वातंत्र्य , समता , बंधुता आणि न्याय – ही चार मूल्ये संविधानाची पायाभरणी आहेत . ही मूल्ये कागदावर नाहीत ; ती भारतीय लोकशाहीची जीवनवाहिनी आहेत . डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या मूल्यांना संविधानरूपी शाश्वत स्वरूप दिले . मूलभूत अधिकार – समानतेचा हक्क , अभिव्यक्ती स्वातंत्र्य , शोषणाविरुद्ध संरक्षण , धर्मस्वातंत्र्य , शिक्षणाचा हक्क – हे सर्व आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेचे मजबूत कणा आहेत . मानवाधिकार दिनाची आजची गरज जग बदलले , तंत्रज्ञान वेगाने पुढे गेले , समाज शिक्षित झाला , तरीही मानवतेसमोरील संकटे संपलेली नाहीत . जातिभेद , लिंगभेद , दारिद्र्य , बालमजुरी , मानवी तस्करी , मानसिक आरोग्याच्या समस्या , युद्धे , निर्वासितांची करुण कहाणी – ही आजच्या मानवजातीची नवी आव्हाने आहेत . म्हणून मानवाधिकार दिन सांगतो – मानवता अजून जिंकलेली नाही . लढाई अजून संपलेली नाही .महिला आणि मानवाधिकार : सन्मानाची शाश्वत लढाई – महिला सक्षमीकरण हा मानवाधिकारांचा मूलस्तंभ आहे . समाजातील प्रगती असूनही घरगुती हिंसा , छेडछाड , कार्यस्थळी असमानता , मुलींच्या शिक्षणातील अडथळे – ही समस्या आजही कायम आहेत . स्त्रीचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान – या तत्त्वाची आजही नव्याने जाणीव करून देण्याची गरज आहे . ग्रामीण स्त्रिया : मानवाधिकारांचा न बोलेला अध्याय मातीचा वास , ओंबळीचा धूर , शेताची कुस , डोईवरच घमेल – ग्रामीण भारतात स्त्री हीच घराची धुरा आणि शेताची श्वास आहे . परंतु तिच्या कष्टांना अद्याप योग्य हक्क आणि मान्यता मिळालेली नाही . पाणी आणण्यापासून शेतीमधील श्रमापर्यंत घराची जबाबदारी ते मुलांच्या संगोपनापर्यंत – प्रत्येक भूमिका ती न आवाज करता निभावते . पण निर्णय प्रक्रियेत तिचा आवाज क्वचितच ऐकू येतो . मानवाधिकार दिन सांगतो – ज्यांच्यावर घर उभं आहे त्यांच्या हक्कांचीदेखील भक्कम पायाभरणी व्हायला हवी . ग्रामीण स्त्री म्हणजे मातीची मूर्ती – कठोर , सहनशील आणि तुटूनही पुन्हा घडणारी . तिच्या शिक्षणाचा हक्क , आरोग्याचा हक्क , सुरक्षिततेचा हक्क आणि सन्मानाने जगण्याचा हक्क – हे मानवाधिकारांचे मूलस्वर आहेत . बालकांचे अधिकार : भविष्यातील मानवतेचे संरक्षण बालपण हा मानवतेचा सर्वात कोमल आणि महत्त्वाचा टप्पा आहे . परंतु अजूनही शिक्षण , आरोग्य , सुरक्षितता या मूलभूत गोष्टी अनेक मुलांना उपलब्ध नाहीत . बालमजुरी आणि अत्याचारांच्या घटना चिंता वाढवतात . बाल हक्क म्हणजे मानवतेचे भविष्य सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी – ही ओळ बालहक्कांचे महत्त्व स्पष्ट करते . मानसिक आरोग्य : न दिसणारा पण गंभीर मानवाधिकार मुद्दा मानसिक आरोग्य हे शरीराइतकेच महत्त्वाचे आहे . नैराश्य , ताण , चिंता , व्यसन , सामाजिक एकाकीपणा – या समस्या वाढत आहेत . मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे हे आधुनिक मानवाधिकारांचे केंद्र आहे . भारत , महाराष्ट्र आणि मानवाधिकार चळवळी महाराष्ट्राला सामाजिक न्यायाचा समृद्ध वारसा लाभला आहे . फुले , सावित्रीबाई , शाहू महाराज , बाबासाहेब – यांनी मानवाधिकारांची पायाभरणी केली . आज राज्य शासन संविधान जनजागृती , महिला सुरक्षा , बालसुरक्षा , दिव्यांग अधिकार , पर्यावरण संरक्षण – अशा अनेक उपक्रमांतून मानवतेचा संदेश पोहोचवत आहे . मानवाधिकार आणि डिजिटल युग : नवे स्वातंत्र्य , नवे धोके ए आय , सोशल मीडिया , निगराणी तंत्रज्ञान , डेटाचा गैरवापर – या सर्वांनी डिजिटल मानवाधिकारांचा विषय अधिक गंभीर केला आहे . गोपनीयता , माहिती सुरक्षा , वैयक्तिक स्वातंत्र्य यांचे रक्षण आज अत्यंत आवश्यक आहे . समाजाची भूमिका : हक्क जपायचे असतात मानवाधिकार दिन हा नुसत्या घोषणांचा दिवस नाही ; तो कृतीचा दिवस आहे . प्रत्येक नागरिकाने भेदभावाला नकार देणे , दुर्बलांच्या बाजूने आवाज उठवणे , सत्याचा शोध घेणे , संविधानाचा आदर करणे – हे आचरणात आणणे गरजेचे आहे . जेव्हा तू अन्याय पाहून शांत राहतोस , तेव्हा तूही त्या अन्यायाचा भाग बनतोस – ही चेतावणी आजही तितकीच लागू आहे . मानवता : मानवतेचा दिवा ; माणूस नावाचा दिवा मातीचा नसतो ; मनाचा असतो . मानवतेच्या श्वासात जळणारी जिवंत ठिणगी आहे ती . जात नाही , धर्म नाही , वर्ग नाही – माणूस हीच खरी ओळख . हक्क जपले तरच जग सुंदर ; अन्यथा भविष्य धुरकट होतं . मानवाधिकार म्हणजे मानवतेचे हृदय मानवाधिकार दिन सांगतो – माणूस महान त्याच्या जन्माने नाही ; त्याच्या विचारांनी होतो . मानवतेची मोजणी सत्ता , पैसा , पद यांनी होत नाही ; तर संवेदना , न्याय आणि माणुसकी यांनी होते . जग बदलण्यासाठी मोठ्या क्रांत्या लागत नाहीत ; माणूस माणसासारखा वागला , तरी पुरेसं आहे .

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

# सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला आज एक वर्ष पूर्ण

### एक वर्षानंतरही न्याय नाही; आरोपींना फाशीच झाली पाहिजे, नाहीतर आंदोलन पेटवू, कुटुंबीयांचा इशारा

बीड, (प्रतिनिधी):- मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली त्या क्रूर घटनेला आज वर्ष पूर्ण झालं. या हत्या प्रकरणात मुख्य सूत्रधार म्हणून धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय समजला जाणारा वाल्मिक कराड याचं नाव समोर आलं. तेव्हापासून संतोष देशमुख यांचे कुटुंबीयांकडून तसेच विरोधकांकडून धनंजय मुंडेयांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. पुढे मुंडे यांचा राजीनामा झाला. सध्या यातील एक आरोपी फरार असून बाकी अटक आहेत.



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचं ९ डिसेंबर २०२४ ला अपहरण करण्यात आलं आणि त्यानंतर त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर केज आणि मस्साजोग या ठिकाणी आंदोलन करण्यात आलं. सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण आणि हत्या झाली, त्या दिवशी नेमकं काय घडलं होतं तेदेखील कुटुंबीयांनी सांगितलं होतं. दरम्यान, आजही आम्ही न्यायाच्या प्रतीक्षेत आहोत अशी प्रतिक्षा संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी दिली आहे. ज्यावेळी आमच्या गावात फिरता तेव्हा आमच्या भावना कळतील. आई सकाळपासून रडते आहे की वर्षभरापासून वाट पाहते आहे, की दादा कुठं आहे? आज एक वर्ष झालं आहे. न्याय मिळायला हवा होता आणि आरोपींना फाशी व्हायला हवी होती. पण आरोप फ्रेम व्हायचे आहेत. या प्रकरणातला फरार आरोपी कुठे आहे असा आमचा सवाल आहे. पोलीस खात्यातले काही लोक आरोपींना मदत करत होते. त्यांना शिक्षा व्हायला हवी असंही ते म्हणाले. मी माझ्या भावाच्या विचारांवरच वाटचाल करतो आहे. ज्या दिवशी आरोपींना फाशी होईल आणि त्यांना मदत करणाऱ्या पोलिसांना शिक्षा केली जाईल तीच माझ्या भावाला श्रद्धांजली ठरेल. मी माझ्या भावाचा विचार कधीही संपू देणार नाही असंही धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे. दरम्यान, आज येथे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यासह अनेकांनी मस्साजोग या गावी भेटी दिल्या आहेत.

# राष्ट्रवादीला मिळाली नवी 'शक्ती'! शितलताई धोंडरे यांच्याकडे बीड महिला जिल्हा कार्याध्यक्षपदाची सूत्रे

बीड (प्रतिनिधी):- बीडच्या राजकारणात आता थेट 'संघर्ष' आणि 'धार' दिसणार आहे! आपल्या आक्रमक व प्रभावी सामाजिक कार्यामुळे सतत प्रकाशझोतात राहिलेल्या सौ. शितलताई धोंडरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) बीड महिला जिल्हा कार्याध्यक्षपदी धडाकेबाज नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात महिलांच्या 'पॉवरफुल' बाजूचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नेतृत्वाची या निमित्ताने एन्ट्री झाली आहे. सौ. शितलताई धोंडरे यांनी आजवर अनेकदा जनतेच्या प्रश्नांवर 'हल्लाबोल' केला आहे. त्यांची ही धडाकेबाज प्रतिमा आता राष्ट्रवादी काँग्रेसला बीडमध्ये एक नवी आणि निर्णायक 'धार' देणार आहे. ही महत्त्वाची संघटनात्मक नेमणूक राष्ट्रवादी



काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनीलजी तटकरे साहेब, प्रदेशाध्यक्षा सौ. रूपालीताई चाकणकर, प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब आणि गेवराईचे आमदार विजयराजे पंडित साहेब यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली झाली आहे. हा निर्णय म्हणजे आगामी काळात जिल्ह्यातील राजकीय पटलावर 'धुमधडाका' उडवण्याचे स्पष्ट संकेत आहेत! विरोधकांना 'शॉक', कार्यकर्त्यांना 'ऊर्जा' मिळाली असून राष्ट्रवादीच्या नेतृत्वाने धोंडरे यांच्या हाती कार्याध्यक्षपदाची सूत्रे सोपवून बीडमध्ये एक मोठी राजकीय चाल खेळली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये निश्चितच एक 'नवा जोश' संचारला असून, आगामी निवडणुकांमध्ये प्रत्येक बूथवर 'जोरदार टक्कर' पहायला मिळेल. धोंडरे यांची ओळखच 'प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड' करणारी आहे, त्यामुळे आता त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी बीडमध्ये 'प्रचंड वेगाने' विस्तारणार यात शंका नाही! लक्षात ठेवा, ही केवळ एक नेमणूक नाही; बीडच्या राजकारणातील एका नव्या, 'झंझावाती पर्वाची' ही सुरुवात आहे.

# चंदनासारखा देह झिजवला त्याचाच हा सुगंध:हभप बबन महाराज बहिरवाल

दौलावडगाव: आयुष्यभर स्वतः हा उघडे राहून लोकांना आश्रय आणि आधार दिला.कधीच स्वार्थ बघितला नाही.चंदनासारखा देह त्यांनी झिजवला आणि त्याचाच हा सुगंध असल्याचे हभप बबन महाराज बहिरवाल यांनी केले. आष्टी तालुक्यातील कडा येथील वै.ब्र.प.पु.हभप.गुरूवर्य मदन महाराज बिहाणी याच्या २९ व्या पुण्यतिथीनिमित्त २ ते ९ डिसेंबर या कालखंडात अंखड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते.मंगळवारी सांगता प्रसंगी काल्याचे किर्तनरूपी सेवा देताना हभप बबन महाराज बहिरवाल बोलत होते. यावेळी देवीदास आबा धस, युवानेते जयदत्त धस, महेश आजबे,आण्णा चौधरी,संपत म्हस्के,संदिप खाकाळ,गजानन कुलकर्णी,बाबासाहेब मुळीक,पांडुरंग झिंजुर्के, याच्यासह राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर, पदाधिकारी,प्रतिष्ठित नागरिक,भाविक भक्त,व महिला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



# शौचालय वापरात नसल्याने विद्यार्थ्यांना घरी जावे लागते!

लिंबागणेश (प्रतिनिधी):- केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशांनुसार 'जागतिक शौचालय दिना'पासून ते 'मानवी हक्क दिना'पर्यंत म्हणजे १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात हमारा शौचालय – हमारा अभिमान ही विशेष मोहीम राबविण्याचे आदेश जिल्हा परिषद प्रशासनाने दिले. जिल्ह्यातील १३५६ गावांमध्ये वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती, रंगरंगोटी व नियमित वापर सुनिश्चित करण्यात यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले. शौचालय म्हणजे केवळ सुविधा नव्हे तर आरोग्य, सुरक्षितता व प्रतिष्ठेची हमी असल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र प्रत्यक्षात काय? अभियान फक्त कागदोपत्रीच राबवले जात असल्याचे वास्तव पुन्हा समोर आले आहे. कोंबडं वस्ति शाळेची शौचालये अनेक वर्षांपासूनच बंद!

वद्यार्थ्यांची बिकट अवस्था**

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील लिंबागणेश केंद्राखालील कोंबडं वस्ती जिल्हा परिषद शाळेतील शौचालय अनेक वर्षांपासून बंद असून पूर्णपणे निकामी आहेत. परिणामी, विद्यार्थ्यांना शौचालयासाठी सरांची परवानगी घेऊन घरी जावे लागते, अशी व्यथा विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना व्यक्त केली.

अभियानाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे १० डिसेंबरला 'उत्तम शौचालय पुरस्कार' जाहीर होणार असल्याचे प्रशासन सांगत असताना अस्तित्वात नसलेल्या सुविधांची चमकदार कागदी नोंद मात्र व्यवस्थित तयार आहे.

पान १ वरून..

**पालकमंत्री अजितदादा बीडच्या सार्वजनिक**

शासकीय विश्रामगृहामध्ये पाहायला मिळतो, शासकीय विश्राम गृहातील अनेक कर्मचाऱ्यांना अरेरावीची भाषा हे चंद्रकांत बोराडे कडून ऐकायला मिळते. यात मात्र तीळ मात्र शंका नाही, तुकडे पाडून बोगस बिलाची तक्रार एका कार्यकर्त्यांनी केली होती पण त्या कार्यकर्त्यावरती दबाव आणून ती तक्रार मागे घ्यायला लावली, पण त्या तक्रारीच्या अनेक दैनिकांमध्ये बातम्या छापून आलेले आहेत. दैनिक महाराष्ट्र आरंभ त्या तक्रारीच्या अनुषंगाने बीड शहरातील अनेक शासकीय कार्यालयातील रिपेरिंग दुरुस्त्या व बोगस बिला उचललेले पुढील अंकांमध्ये सविस्तर डिटेल माहिती समोर आणणार आहे. त्यामुळे बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी दीडशे कोटीपेक्षा जास्त घोटाळा आहे या प्रकरणात हिवाळी अधिवेशनामध्ये एसआयटी चौकशीची घोषणा करतील का कारण अजित पवार हे भ्रष्टाचाराने बरबटलेल्या अधिकाऱ्यांचे मंत्री असल्याची चर्चाही बीड शहरामध्ये ऐकायला मिळत आहे.

पान ४ वरून..

**एपीओ सुशील झाला सावकार, पैसे द्या वर्ककोड**

आहेत. यात मोठी आर्थिक देवाण-घेवाण झाली असून बीडीओ, एपीओ गब्बर झाले आहेत.

**एपीओ जामकर वसुली सावकार ?**

बीडीओ राठोड हे नरेगा कक्षात कार्यरत असलेले एपीओ सुशिल जामकर यांना पाठिशी घालत आहेत. नरेगा कक्षातील प्रत्येक फाईल मागील वसुली जामकर करत असल्याची चर्चा सुरू आहे. एवढेच काय तर नरेगा कामांच्या फाईल बीडीओंच्या घरूनच चालत आहे. जो पैसे देईल याची काम आगदी वेळेत होत असून सर्वसामान्यांचे कामे मात्र काहीही कारणे सांगून थांबवले जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

**राष्ट्रवादीचे बळीराम गवते यांचे पत्र, प्रशासनात**

मग्रारोह्यो अंतर्गत बीड तालुक्यामध्ये सन २०२३-२४ मधील डिलीट झालेले वर्ककोड लाभार्थ्यांकडून पैसे घेवून नियमबाह्यपणे पुन्हा सन २०२५-२६ मध्ये काढल्याप्रकरणी गटविकास अधिकारी अशोक राठोड व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली असून या पत्रानंतर झेडपीत कारवाईच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

==---ह्व

------------------

**डोळ्यात मिरची चटणी टाकून शस्त्राचा**

पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे गु. रं.न.५०७/२०२५ कलम. ३०९/ (४) १२६.२८१.३ (५) भा. नया. स. प्रमाणे गुन्हा. दाखल झाला.मा.पोलीस आधीक्षक साहेब बीड यानी बीड जिल्ह्यात रोडवर होणारे जबरी चोरीचे गुन्हे उघडकिस आणणयासाठी सथानिक गुन्हे शाखेला आदेश दिले आहेत. त्यावरून पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळ व त्यांच्या टीमला या गुन्ह्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पंकज तुकाराम उगलमुगले वय २५ राहणार पांगरी तालुका परळी वैभव राम बिडकर वय २० राहणार दाऊपूर तालुका परळी जिल्हा बीड श्यामसुंदर बाळासाहेब फड त् राहणार मरळवाडी तालुका परळी आदित्य सुरेश उपाडे वय २० सिद्धार्थ नगर परळी वैजनाथ यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता या चौघांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. पोलिसांच्या या कारवाईत चैन अंगठी मोटर सायकल औ स्कुटी वकोयता आजचा दिवस एक लाख ५८ हजार हजाराचा मध्यमान हस्तगत केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत अप्पर पोलीस अधीक्षक चेतना मॅडम तिडके पोलीस नगरसेवक शिवाजी बनटेवाढ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे पोलीस हवालदार मारुती कांबळे रामचंद्र केकान विष्णू सानप गोविंद भताने सचिन आंधळे अतुल हराळे यांच्यावतीने करण्यात आली. यांचे पथक यांना दिनांक माहिती कळताच स्थानिक शाखेच्या पथकाने सापळा रचून सापळा रचून रोड अड वून जबरी चोरी करणाऱ्या ईशमास तात्काळ परळी शहर पोलीस स्टेशन येथे अटक करण्यात आली आहे.

------------------

**बाबा आढाव: कष्टकऱ्यांचा अविरत प्रहरी मावळला**

उपोषण आणि आंदोलने केली. व्यक्तिशः अनेकदा कारावास व अटक देखील सहन केली. बाबा आढाव यांच्या सततच्या हक्कबुद्धीने आणि संघटनात्मक कार्याने महाराष्ट्रातील असंघटित क्षेत्राच्या हितासाठी काही महत्त्वाच्या धोरणे व कायद्यांवर परिणाम झाला असून स्थानिक पातळीवरील कामगारांच्या कल्याणाच्या बाबतीत त्यांची भूमिका निर्णायक समजली जाते. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्यात मदत झाली. बाबा आढाव काही काळापासून आजाराने त्रस्त होते; त्यांना शेवटच्या दिवसांत पुण्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि तिथे त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या प्रकृतीची गंभीरता लक्षात घेऊन त्यांना लाइफ-सपोर्टवर ठेवण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व अनेक प्रदेशीय नेते आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी बाबा आढाव यांच्या निधनावर दु:ख व्यक्त केले आहे आणि त्यांच्या केलेल्या अपूर्व कार्याची दखल घेतली आहे. अनेक पक्ष आणि सामाजिक संघटनांनी त्यांच्या योगदानाबद्दल आदरांजली वाहिली आहे. बाबा आढाव यांनी जे संघटन आणि आंदोलने उभी केली त्यांचा वारसा महाराष्ट्रातील कामगार-संघटनांमध्ये आजही दिसतो. असंघटित क्षेत्राच्या हक्कांसाठी केलेले त्यांचा प्रयत्न अनेक संघटनांना प्रेरणा देतात; स्थानिक स्तरावर सुरू असलेले अनेक प्रकल्प आणि समाजोपयोगी उपक्रम त्यांचे दीर्घकालीन यश म्हणून गणले जाईल. त्यांच्या मागे त्यांची पत्नी शीला आढाव, दोन मुले असीम व अंबर, सुना व नातवंडे हे त्यांचा जवळचा परिवार आहे.

------------------

**गायगोठा बांधकामाला अपुरी मदत; सुधारीत**

जास्त अनुदान अनुज्ञेय नाही, असेही परिपत्रकात नमूद आहे. मात्र ही सुधारित तरतूद बीड तालुक्यात अद्याप लागू करण्यात आलेली नाही, तर इतर सर्व तालुक्यात अंमलात आली आहे. यामुळे बीड तालुक्यातील शेतकऱ्यांवर अन्याय होत असून त्यांना गंभीर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते, अशी व्यथा अनेक शेतकऱ्यांनी लेखी व तोंडी स्वरूपात मांडल्याचे जगताप यांनी सांगितले. शासन परिपत्रकातील तरतूद स्पष्ट असताना बीड तालुक्यातच सुधारित अनुदान लागू न होणे हा अन्याय आहे. शेतकऱ्यांना टिकाऊ आणि सुरक्षित गोठे बांधण्यासाठी सुधारीत रक्कम मिळणे अत्यावश्यक आहे. असे अनिलदादा जगताप यांनी निवेदनात म्हटले आहे. जगतातील परिस्थिती लक्षात घेता शासन निर्णयाची समान अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी तातडीची मागणी करण्यात आली आहे.

------------------

**ग्रामपंचायत सेवकावर अमानवीय मारहाण ; पाय-हात फ्रॅक्चर**

असून मॉब लिचिंगसदृश ही घटना असल्याने सर्व आरोपींवर ट्रॉसिटी कायद्याच्या कलम ३०७ सह इतर संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करावा, सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी आणि प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी जोरदार मागणी केली आहे.या भेटीप्रसंगी ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, सुंदर वाघमारे, सुर्यकांत ठोकळे, राजेश वाघमारे तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या घटनेमुळे तलवाडा परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून दलित-आदिवासी समाजात संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी तात्काळ कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ऑल इंडिया पँथर सेनेने दिला आहे.

------------------

**आवरगाव परिसरात धाडसी चोरी - मोटार रिवायडिंगचे**

भावना वाढली आहे. घटनेची माहिती मिळताच धारूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या सह पोलिस कर्मचाऱ्यांनी येऊन पंचनामा करून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सीसीटीव्ही फुटेज, संशयित हालचाली व मार्गावरील वाहतुकीच्या आधारे पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. स्थानिक नागरिकांनी रात्रीच्या गस्तीत वाढ करून सुरक्षा उपाय वाढवावेत, तसेच अशा घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांनी तातडीने कडक उपाययोजना कराव्यात अशी मागणीही परिसरातून होत आहे

------------------

**प्रशासन हे कासव गतीने काम करत असून,**

न्यायालयाकडून मालमत्ता लिलाव परवानगी सुद्धा घेतलेली नाही. ही परवानगी कधी मिळेल ? आणि मिळाली तर लिलाव साठी किती महिने लागतील.आणि जनतेचे पैसे कधी मिळेल, हा प्रश्न ठेवीदाराच्या मनात आहे. आत्तापर्यंत बरेच ठेवीदारांनी आत्महत्या केली, कोणाची घरे उध्वस्त झाली, कोणाच्या मुलीचे लग्न मोडले , कुणी कर्ज बाजारी होऊन आत्महत्या केली. तरीसुद्धा प्रशासनाला जाग का येत नाही ? अजून प्रशासनाला किती जणांचे बळी घ्यायचे आहे ? प्रशासनाने लवकरात लवकर न्यायालयाकडून लिलावाची परवानगी घ्यावी, व लवकरात लवकर लिलाव करून गोरगरीब जनतेचे कमीत कमी पाच लाखापर्यंतचे पेमेंट मिळवून द्यावे हीच, ठेवीदारांची प्रशासनाकडे मागणी आहे.

------------------

**वडवणीत निकृष्ट धान्याचा पुरवठा बंद**

झाले तसेच यामध्ये ग्राहक पंचायत संघटनेच्या वतीने या संदर्भात तहसीलदार यांना केली. निवेदन देऊन धान्य तहसीलदार साहेब यांच्या टेबलावर टाकून दिले होते. व निकृष्ट दर्जाचे धान्य वितरण करण्यात येवू नाही. व चांगल्या दर्जाचे धान्य वाटप करण्यात येवे अशी मागणी केली होती. या निवेदनची दखल घेऊन मा. तहसिलदार साहेब व पुरवठा निरीक्षक अधिकारी यानी डिसेंबर महिन्याचा चांगल्या दर्जाचे स्वस्त धान्य दुकानात धान्य तांदूळ व ज्वारी ची मालवाहतूक गाडी आली असता स्वस्त धान्य दुकान बी. के. शिंदे व वडवणी तहसिल कार्यालयाच्या पुरवठा निरीक्षक नयनतम, ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी तालुका अध्यक्ष शंकरराव झाडे, पुरवठा गोडाऊन व्यवस्थापन अधिकारी अरुण गिरी, ॲड. ईश्वर रोमण यांनी पाहणी करून तपासणी

# केज येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न



केज (प्रतिनिधी):- मराठा सेवा संघ, केज शाखेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळा रविवारी शिक्षणाधिकारी कार्यालय, केज येथे दिमाखात पार पडला. तालुक्यात उत्कृष्ट अध्यापन व उपक्रमशील कार्य करणाऱ्या १६ शिक्षकांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

गौरवप्राप्त शिक्षकांत महादेवी फुलसुरे (धर्माळा), मोहन ढाकणे (सारणी), व्यंकट चव्हाण (हनुमाननगर-लाडेवडगाव), संध्याराणी कोल्हे (लाखा), सुरेखा मोराळे (साळेगाव), नवनाथ घुगे (होळ), रेखा धेंडे (बोरीसावरगाव), संगीता नवले (सोनिजवळा), नितीन हावळे (दरडवाडी), स्वाती वरपे (देवगाव), बाबुराव तांबडे (ढाकणवाडी), बालासाहेब लोखंडे (पांडुरंगवस्ती-पैठणे), आश्रुबा गायकवाड (बावची), पुंडलिक पोपळघट (बोरगाव), शामल जाधव (जाधवजवळा) आणि मोहसिन साबेर कुरेशी (लाखा उर्दू) यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे, तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार राकेश गिड्डे उपस्थित होते. यावेळी जी.बी. गदळे, नागनाथ जाधव, दत्ता चाटे, हनुमंत भोसले, हनुमंत घाडगे, डॉ. हनुमंत सौदागर, शिवाजी ठोंबरे, मोहन गुंड, गोविंद शिनगारे, राहुल खोडसे, रामकीसन मस्के, योगेश अंबाड आदी मान्यवर उपस्थित होते. तहसीलदार राकेश गिड्डे यांनी शिक्षक हा समाजाचा दिशा-दर्शक दीपस्तंभ असल्याचे सांगत, राष्ट्रनिर्मितीसाठी सक्षम नागरिक घडविण्यात शिक्षकांचे योगदान अनन्यसाधारण आहे, असे मत व्यक्त केले. हनुमंत भोसले म्हणाले, केज तालुक्यातील अनेक गुणवंत शिक्षकांना शासकीय पुरस्कार मिळत नसतानाही अशा उपक्रमांमधून त्यांना नवी ऊर्जा प्राप्त होते. सुनिल केंद्रे यांनी मराठा सेवा संघाच्या उपक्रमाचे कौतुक करत, पुरस्कारातून नवउत्साह व उत्तम कार्याची प्रेरणा मिळते, असे नमूद केले. कार्यक्रमाची प्रस्तावना युवराज हिरवे यांनी केली. सूत्रसंचालन विक्रम डोईफोडे यांनी तर आभार प्रदर्शन व्हि.एम. यादव यांनी केले. आयोजनात जयदीप देशमुख, किशोर भालेराव, युवराज हिरवे, महादेव ढाकणे, चंद्रकांत मोरे, तुषार पाटील, दयानंद खोपे, आण्णा कदम, आतिश गाढवे, राहुल देशमुख यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्यास शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाद्वारे केज तालुक्यातील शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करून त्यांना नव्या ऊर्जेचा संदेश देण्यात आला.

## श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी



टाकरवण,(प्रतिनिधी) : येथील ग्रामपंचायत कार्यालयात जगद्गुरु श्री. संत तुकाराम महाराज यांची गाथा संकलन करणारे तेली समाजाचे आराध्य दैवत श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी सभापती भागवत खुळे हास्ते संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व माल्यार्पण करूण अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण गरड, गणेश काजळे, गणेश सातपुते, महादेव कदम, जिजा तौर, भागवत कोरडे, विलास गणगे, विलास लव्हाळे, प्रकाश गरड, कैलास सातपुते, किसन गणगे, सतिष राठोड, वसंत पुंगळे, बालासाहेब ढबुळे, पंचफुला खरात यांच्यासह नागरीक मोठ्या सख्येने उपस्थीत होते.

## नगरपालिका निवडणुकांची मतमोजणी ३१ डिसेंबरला करावी-एस.एम.युसूफ

बीड (प्रतिनिधी) - नुकत्याच झालेल्या नगरपालिकांच्या निवडणुकीची मतमोजणी ही २१ डिसेंबरला होणार आहे. या ऐवजी ३१ डिसेंबरला मतमोजणी करावी अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केली आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, नगरपालिका निवडणूकीसाठी अनेक वर्षांचा विलंब व प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर २ डिसेंबर २०२५ रोजी राज्यात एकदाचे मतदान झाले. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार होती परंतु कुठे माशी शिंकली माहित नाही. आता २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. म्हणून आता २१ डिसेंबर रोजी निकाल लागणार आहे. एव्हाना मतमोजणीला विलंब हा झालाच आहे तर अजून १० दिवसांचा विलंब करून ३१ डिसेंबर रोजी मतमोजणी करावी. कारण या दिवशी इंग्रजांसारखेच आपल्याकडेही नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जल्लोषाची तयारी केली जाते. देशी-विदेशी दारू ढोसण्यासाठी दारू प्रेमींकडून मोठ्या प्रमाणात नियोजन केले जातात. सर्वसामान्य ही इंग्रजांच्या या नवीन वर्षाचा हर्षोल्लासात आनंद साजरा करतात. मग ते कोणत्याही जाती धर्माचे असो. सर्वांना इंग्रजांचे हे नवीन वर्ष आपलेसे वाटते. किती शोकांतिका आहे. आपल्याकडे मराठी नवीन वर्ष असो की इस्लामिक नवीन वर्ष असो, त्यांना ना हिंदू बांधव महत्त्व देतात, ना मुस्लिम बांधव. परंतु ३१ डिसेंबर आला की, सर्व जाती धर्माचे आपले भारतीय लोक मोठ्या प्रमाणात चेव आणून साजरे करतात. रात्रभर जागरण करून धिंगाणा घालतात. हाच प्रकार निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर केला जातो. यामुळे २१ डिसेंबरला मतमोजणी झाल्यानंतर तेच होणार आहे आणि ३१ डिसेंबर रोजी नवीन वर्षाचे स्वागत म्हणून सुद्धा तेच होणार आहे. याकरिता निवडणुकीची मतमोजणी ही ३१ डिसेंबर रोजीच



करून निकाल जाहीर करावेत. एरवी निवडणुका कोणत्याही असो निकाल लागल्यानंतर विजयी आणि पराभूत उमेदवार व त्यांच्या समर्थकांमध्ये बाचाबाची थोड्या अधिक प्रमाणात होतच असते तर कधी कधी ही बाचाबाची हाणामारी पर्यंत सुद्धा पोहोचते. ३१ डिसेंबर रोजी मतमोजणी केल्यास निवडून आलेले उमेदवार व त्यांचे समर्थक विजयी झाले म्हणून दुहेरी जल्लोष आणि आनंद साजरा करतील तर पराभूत झालेले उमेदवार आणि त्यांचे समर्थक सुद्धा पराभवाचे शल्य बाजूला ठेवून ३१ डिसेंबर च्या नवीन वर्षाचे स्वागत म्हणून जल्लोष आणि आनंद साजरा करतील. पर्यायाने भांडण-तंटे व्हायला जागाच राहणार नाही कारण सर्वांना डिसेंबर रोजी नवीन वर्षाचे स्वागत करायचे असेल म्हणून २१ डिसेंबर ऐवजी ३१ डिसेंबरला मतमोजणी करून निकाल जाहीर केल्यास यानिमित्ताने कधी नव्हे ते विजय आणि पराभूत उमेदवार व त्यांचे समर्थक असे सर्वचजण जल्लोष साजरा करताना दिसतील. अशाप्रकारे सर्वांनाच आनंद देण्याकरिता मतमोजणीची तारीख वाढवून २१ डिसेंबर ऐवजी ३१ डिसेंबर करावी अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केली आहे.

## अंजनडोह येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण



धारूर (प्रतिनिधी):- तालुक्यातील अंजनडोह येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळयासाठी शिवप्रेमींनी अनेक दिवसापासून गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळा उभारण्याची इच्छा होती त्यासाठी छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठान चे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या कडे आपल्या भावना व्यक्त केल्या त्यांच्या प्रयत्नातून अंजनडोह येथे पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला असून या वेळी अंजनडोह येथील नागरिकांनी बाळराजे आवारे पाटील यांचे आभार व्यक्त केले मागील अनेक दिवसापासून अंजनडोह येथील शिवप्रेमी सातत्याने प्रयत्न करत होते धर्मवीर छत्रपती श्री. संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष : बाळराजे आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धारूर तालुक्यातील अंजनडोह येथे गावाच्या मुख्य प्रवेशद्वारात ६ डिसेंबर रोजी पहाटे ५:२५ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. अंजनडोह आणि परिसरातील तरुणांना सकारात्मक प्रेरणा मिळेल व छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपला जाईल. आवारे पाटील यांच्यामुळे खऱ्या अर्थाने सोनेरी पहाट उगवल्याची भावना गावातील सर्व नागरिकांमध्ये आहे शिवप्रेमींच्या अनेक दिवसांच्या प्रयत्न व बाळराजे आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यश आल्यामुळे शिवप्रेमीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## देव खंडोबाची पालखी व महाप्रसाद उत्साहात,आनंदात व शांततेत संपन्न

धारूर (प्रतिनिधी):- दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मार्गशीर्ष महिना मध्ये या खंडोबा देवा ची पालखी उत्सव साजरा करण्यात आला आज ७ डिसेंबर रोजी श्री गणेश चतुर्थी व खंडोबा पालखी हा दुग्ध शर्करा योग साधून अतिशय उत्साहात खंडोबा पालखीचे आयोजन केले होते तरी सर्व भक्त मंडळी, नातेवाईक, आराधी मंडळ व मित्र परिवार यांच्या श्री खंडोबा पालखी सोहळा अतिशय थाटा माटात सर्वांच्या उपस्थितीत संपन्न झाला, या पालखीमध्ये देव खंडोबा ची पालखीचे बैलगाडी मध्ये फुलांची सजावट करून खंडोबा देवाची उत्सव मूर्ती चे विराजमान केली त्याची मिरवणूक शिंदे निवास येथून आरती करून प्रस्थान केले होते, यानंतर सर्व खंडोबा भक्त यांच्या उपस्थितीत देवाला देवघरातून पालखीपर्यंतसाडी च्या पायघड्या टाकून



त्याची उत्सव मूर्ती ची स्थापना बैलगाडी मध्ये ठेऊन प्रस्थान केले,

यानंतर श्री खंडोबा पालखी उत्सव समोर पारंपरिक पद्धतीने संबळ पथकाने आपल्या वाद्याने सर्व वातावरण भक्तीमय आणि आंनद दायी केले होते, वारूळ पथकाने देवाचे कोडे मारून उपस्थित सर्वाना आवाक केले, या मध्ये देवाचे वार हातावर, अंगावर घेत असे लहान मुला पासून वयोगटातील सर्वांनी या देवाचे वारू घेतले गेले, पिपाणी वादक , ढोल वादक, या सर्व पारंपारिक वाद्यांचे वाजत गाजत आप आपल्या कला गुणांचे सादरीकरण करत अतिशय उत्साहाच्या वातावरणात छत्रपती शिवाजी चोक कडे प्रस्थान करून नगर प्रदक्षिणा मारली जाते, भंडाऱ्या ची उधळण करत भक्तां चे नाचत, खंडोबा देवाचे गीत गायन करत खंडोबा देवाचे नाम समरण करत येळकोट येळकोट जय मल्हार चे व खंडोबा देवाचं चांगभलं या देवाच्या नावानी जयघोष देत खंडोबा पालखी चे भक्तअतिशय प्रसन्न व भक्तीमय वातावरणात पालखी उत्साहात व वाजत गाजत मिरवणूक मिरवली काढली गेली, सर्व गावकरी मंडळी, आराधी मंडळ, संबलं पथक, नातेवाईक, परिवाराने पालखी चे दर्शन घेत आरती ओवाळली व देवाचे जयघोष दिले या नंन्तर नगर प्रदक्षिणा झाल्यानंतर सर्व भक्तांच्या उपस्थितीत महाआरती करून महाप्रसादाचे आयोजन लिंगायत मठ येथे केले होते आनंदात महाप्रसादाचा आशीर्वाद रुपी आस्वाद घेतला काही जणांनी चतुर्थी देखील या ठिकाणी सोडली गेली, रात्र भर गीत, भारूड, भजन करत देवाचे जागरण केले गेले तरी सर्व भक्तांनी या खंडोबा पालखी मध्ये सहभागी झाले होते मोठ्या उत्साहात आनंदात व शांततेत पार पडली आयोजक कमिटीने आलेल्या सर्व भक्त मंडळीचे गावकरी, आराधी, सर्वांचे मनस्वी आभार मानले

## कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, 'संत जगनाडे महाराज' यांची जयंती साजरी



शिरूर कासार (प्रतिनिधी):- दि.८ डिसेंबर २०२५ सोमवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे 'संतश्रेष्ठ संताजी जगनाडे महाराज' यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे यांच्या हस्ते,श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी विज्ञान विभाग प्रमुख प्रा.संजय काकडे,प्रा.महारूद्र डोंगरे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे,प्रा.नारायण घोलप,प्रा.अशोक इनकर,प्रा.प्रशांत मळेकर,प्रा.संजय आव्हाड,प्रा.अनिल जरे,प्रा.दत्ता शिंदे,प्रा.बिभिषण घायाळ,प्रा.महादेव हांगे,प्रा. विश्वास ढाकणे,प्रा.नारायण तांबे,प्रा.लक्ष्मण गव्हाणे, डॉ.सत्यनारायण ढवळे,प्रा.सुनिल मोरे,प्रा.दत्ता गायकवाड,प्रा.घनश्याम चव्हाण,प्रा. शशिकांत जावळे,डॉ.अशोक घोडके,प्रा.अशोक सवासे,प्रा.विनोद गलांडे,प्रा.हनुमंत घायाळ,प्रा.बाळासाहेब खटाणे,प्रा.अक्षय रणखांब,प्रा.अमर खोले,प्रा.सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ,प्रा.सिमा ढवळे,सौ.अनिता लाटे,रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,वसंत आहेर,जयेंद्र निकम,राजू बडे,आप्पासाहेब कांबळे,प्रकाश राऊत,नितीन बहिर,रोहित शिराळे,आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर,विलास कांबळे,गौतम भोसले आणि विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी,संत जगनाडे महाराज' यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले.

### केज येथे मूल्यवर्धन ४.० प्रशिक्षणाचा तिसरा टप्पा उत्साहात सुरू

## साने गुरुजी निवासी विद्यालयात प्रा. डॉ. कविता कराड यांच्याकडून उद्घाटन



केज (प्रतिनिधी):- केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात सोमवारी तालुकास्तरीय मूल्यवर्धन ४.० प्रशिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्याचे उद्घाटन प्रा. डॉ. कविता कराड यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुण शिंदे सर होते. प्रशिक्षणाच्या या टप्प्याला तालुक्यातील शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदविली.

उद्घाटन सत्रात मदने सर, चंद्रकांत मुंडे, संध्याराणी कोल्हे मॅडम, विक्रम डोईफोडे यांसह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. प्रा. डॉ. कविता कराड यांनी मूल्यवर्धन ४.० उपक्रमाचे उद्दिष्ट, बदलत्या शैक्षणिक पद्धतींची गरज, विद्यार्थी-केंद्री अध्यापन मॉडेल्सचे महत्त्व आणि अध्यापनात तंत्रज्ञान व नवकल्पनांचा वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षकांमध्ये अध्यापनातील कौशल्यविकास, नाविन्यपूर्ण प्रयोगांची गरज आणि शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी प्रशिक्षणाची भूमिका अधोरेखित केली. मान्यवरांनी आपल्या मनोगतात, या प्रशिक्षणातून शिक्षकांना आधुनिक अध्यापनतंत्रांचा वापर, विद्यार्थ्यांच्या क्षमताविकासाला चालना देणाऱ्या पद्धतींचा अवलंब तसेच शैक्षणिक साधनसामग्रीचा अधिक प्रभावी वापर करण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे शिक्षक साखरे सर यांनी केले. संपूर्ण प्रशिक्षण सत्र उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले असून तालुक्यातील शिक्षकांच्या सहभागामुळे तिसरा टप्पा अधिक यशस्वी झाला. उद्घाटन कार्यक्रमानंतर प्रशिक्षणाचे पुढील उपक्रम व सत्रांची सुरूवात करण्यात आली असून मूल्यवर्धन ४.० उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच गती मिळणार असल्याचा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

## टाकळी आश्रमशाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम



केज (प्रतिनिधी):- टाकळी येथील प्राथमिक निवासी आश्रम शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आदरपूर्वक संपन्न झाला. शाळेच्या प्रांगणात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी तसेच उपस्थित ग्रामस्थ व मान्यवरांनी महान संविधानकर्त्याला विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाच्या प्रमुख सत्रात शाळेचे संस्थाचालक श्रीकांत घुले यांनी डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संविधानिक योगदानाचा सविस्तर आढावा घेत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी संविधान मूल्ये, समता, बंधुता आणि शिक्षणाचे सामर्थ्य याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली. शिक्षक व कर्मचाऱ्यांनीही डॉ. आम्बेडकरांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना ज्ञान, प्रगती आणि सामाजिक उत्तरदायित्वाची दिशा दाखवली. विद्यार्थ्यांनी या प्रसंगी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांतून सामाजिक संदेशपर गीत, कविता व लघुनाट्य सादर करत महापुरुषांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात आश्रमशाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका, कर्मचारी तसेच गावातील नागरिकांची उपस्थिती होती. ज्ञान, समता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांचा पुनःस्मरण करून कृतज्ञतेच्या वातावरणात अभिवादन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## किल्ले धारूर न्यायालयाचा वर्धापन दिन जिल्हा न्यायाधीश यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न



धारूर (प्रतिनिधी):- किल्ले धारूर न्यायालयाचा २३ व्या वर्धापन दिनानिमित कार्यक्रम घेण्यात आला सदरचा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. या प्रसंगी वकील संघांचे अध्यक्ष ऍड परमेश्वर शिनगारे यांनी प्रस्ताविकात अडचणी नमूद केल्या व विचार व्यक्त केले. ऍड पीडी मिश्रा वैष्णवी बडे यांनी विचार व्यक्त केले . प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्री आनंद यावलकर साहेब यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालनवकील संघाचे उपअध्यक्ष ड.मोहन भोसले तर आभार ऍड व्ही. एम शिनगारे यांनी केले या वेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रमुख जिल्हा न्यायाधीश बीड श्री आनंद यावलकर,जिल्हा अतिरिक्त न्यायाधीश केज सुधीर भाजीपाले, जिल्हा न्यायाधीश श्रीमती आर.के.शेख मॅडम किल्ले धारूर न्यायालयाचे न्यायाधीश श्री एन एम वाली साहेब केज न्यायालय येथील न्यायाधीश श्रीमती एम एस कुलकर्णी मॅडम केज येथील न्यायाधीश श्रीमती पी व्ही चव्हाण मॅडम सरकारी वकील श्री थेरोकर साहेब ए एस गायसमुंद्रे साहेब वकील संघ अध्यक्ष ड पी पी शिनगारे पाटील वकील संघ उपाध्यक्ष ड एम बी भोसले सचिव सी बी हांगे मैडम कोषाध्यक्ष ड एस जे गडदे ग्रंथालय ड आर एस सावंत तसेच वकील बांधव कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी झाला या कार्यक्रमासाठी वकील बांधवानी अतिशय परिश्रम घेतले. कार्यक्रम अतिशय सुंदर पद्धतीने पार पडला.

# एपीओ सुशील झाला सावकार, पैसे द्या वर्ककोड घ्या ;बीड पंचायत समितीत 'पैसे बाजार'

## पैसे द्या, योजनांचा लाभ घ्या; सामान्यांचा त्रास थांबेना ;बळीराम गवतेची तक्रार

### बीड पंचायत समितीतील कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर दैनिक आरंभ करणार सुशील जामकरच्या भ्रष्टाचाराचा भांडाफोड ?





बीड (प्रतिनिधी):- बीड पंचायत समितीत सध्या केवळ पैशांचा खेळ सुरू आहे. पैसे द्या, योजनांचा लाभ घ्या असे म्हणत नरेगा कक्षातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पैशांचा बाजार मांडला आहे. जो पैसे देईल अशांचीच कामे होत असून सर्वसामान्यांसमोर मात्र थांबाचा पाढा वाचला जात आहे. बीडीओ एपीओ पैसे खावून गब्बर झाले आहेत. मग्रारोहयो अंतर्गत बीड तालुक्यामध्ये सन २०२३-२४ मधील डिलीट झालेले वर्ककोड लाभार्थ्यांकडून पैसे घेवून, नियमबाह्यपणे पुन्हा




सन २०२५-२६ मध्ये काढले आहेत. मग्रारोहयो अंतर्गत बीड तालुक्यातील वैयक्तिक लाभार्थ्यांचे गायगोठा, वैयक्तिक जलसिंचन विहीर, शेततळे कामाचे सन २०२३-२४ मधील ७४०० वर्ककोड डिलीट झालेले आहेत. सदरील

वर्ककोड हे कोणत्या आधारे डिलीट झाले याची माहितीही दिली जात नाही. तसेच डिलीट झालेले वर्क कोड हे पुनश्च सन २०२५-२६ मध्ये काढलेले ऑनलाईन पोर्टलवर दिसून येत आहेत. गटविकास अधिकारी अशोक राठोड व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सुशिल जामकर यांनी संगनमत करून लाभार्थ्यांकडून पैसे घेवून डिलीट झालेले वर्ककोड सन २०२५-२६ मध्ये कुठलेही शासन आदेश नसताना काढल्याचे दिसून येत आहे, सदरील अधिकारी पैसे घेवून फक्त मर्जीतील लोकांचेच वर्ककोड काढत आहेत. उर्वरीत ७४०० लाभार्थ्यांचे वर्ककोड काढण्यास टाळाटाळ करीत आहेत. यामुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे. शासन नियमाप्रमाणे मंजुर झालेले काम हे २ वर्षामध्येच पुर्ण करणे गरजेचे आहे. डिलीट झालेल्या कामाची मुदत संपलेली असतानाही पुनश्च वर्ककोड काढलेले पान २ वर...

# माजी पं.स.सदस्य दिगांबर मेहेत्रे यांचे निधन



पिंपळा (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील पिंपळा येथील रहिवासी व पिंपळा-लोणी पंचायत समिती गणाचे माजी सदस्य कै.दिगांबर नागु मेहेत्रे यांचे अल्पशा आजाराने दुःखत निधन झाले आहे.मृत्यू समयी त्यांचे वय ७७ वर्षे होते.त्यांच्या पश्चात एक मुलगा,दोन मुली व नातेवाईकांचा मोठा परिवार आहे.पिंपळा परिसरात त्यांचे मोठे सामाजिक कार्य होते.त्यांचा दशक्रिया विधी बुधवार दि.१०/१२/२०२५ रोजी सकाळी पिंपळा येथे होणार आहे.त्यानिमित्ताने ह.भ.प.राऊत दादा महाराज(पिंपळेश्वर संस्थान पिंपळा)यांचे किर्तन वाजता होणार आहे.

# बाबा आढाव: कष्टकऱ्यांचा अविरत प्रहरी मावळला

बीड (प्रतिनिधी):- ज्येष्ठ समकाजसेवक व श्रमिक चळवळीचे नेते डॉ.बाबासाहेब (बाबा) पांडुरंग आढाव यांचे सोमवारी पुण्यात दीर्घ आजारानंतर निधन झाले. ते सुमारे ९५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील असंघटित क्षेत्रातील कामगार-आंदोलनाला मोठा धक्का बसला आहे.



बाबा आढाव यांचा जन्म पुण्यात झाला. वैद्यकीय पार्श्वभूमी असूनही त्यांनी आयुर्वेदकीय व्यवसाय थांबवून संपूर्ण आयुष्य समाज सेवेला समर्पित केले. घरगुती, हमाल, रिक्षा चालक, बांधकाम मजूर आणि असंघटित क्षेत्रातील इतर कामगारांच्या कणखर व पुढाकाराने त्यांनी काम केले. त्यांच्या आयुष्यातील बहुतेक पिढ्या गरीबी व अन्यायातून उभे राहिलेल्या वर्गांसाठी समर्पित होत्या.

बाबांनी हमाल पंचायतची स्थापना केली हे हमाल व इतर असंघटित कामगारांचे एक शक्तिशाली संघटन ठरले. या संघटनेतून अनेक मृतप्राय कष्टकरी संघटनांचे हक्कांसाठी संघर्ष सुरू झाले आणि स्थानिक पातळीवर कामगारांचे नियोजन व नागरी समस्यांवर दाब निर्माण झाला. त्यांचे काम १९६०-७० च्या दशकापासून सतत आणि ठोस आहे, ज्यामुळे स्थानिक व राज्यस्तरीय धोरणांवरही परिणाम झाला. असंघटित कामगारांच्या हमाल, रिक्षाचालक, कचराप्रवाहक, बांधकाम मजुरी इत्यादींच्या हक्कासाठी त्यांनी अविरत लढा दिला. ग्रामीण पातळीवरील समाजोपकारी उपक्रमामध्ये एक गाव, एक पाणवठा सारखे शेतकऱ्यांवरील व सामाजिक समतेवरील अभियान त्यांनी उत्तम रित्या राबविले. कामगार-कल्याण आणि स्थानिक न्यायसंगतता यांच्या मुद्यांवर सातत्याने त्यांनी जनआंदोलन पान २ वर...

# डोळ्यात मिरची चटणी टाकून शस्त्राचा धाक दाखवून जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद

परळी (प्रतिनिधी):- परळी वैजनाथ मंदिर रोडवरील येथील दिनांक पाच बारा रोजी एका इसम हा अरुणोदय मार्केटमधील बॉस फिटनेस येते व्यायाम करून त्याचे गावाकडे दारावती तांडा परळी वैजनाथ येथे मोटर सायकल वरून जात असताना काल रात्री देवी च्या रोड समोर रोडने पुढे गेल्यावर संध्याकाळच्या सुमारास ७.३० वाजून त्यांची मोटरसायकल दोन इसम पाठीमागून घेऊन त्याच्याकडील पल्सर मोटरसायकल आडवी लावून फिर्यादीला धमकावले



त्यानंतर स्कुटीवर आणखी दोघांनी येऊन त्या ईशमास चाकूचा धाक दाखवून त्या इसमाच्या डोळ्यात चटणी पावडर टाकून त्याची सोन्याची चैन व दोन अंगठ्या जबरीने चोरून नेल्यावरून पान २ वर...

# गायगोठा बांधकामाला अपुरी मदत; सुधारीत अनुदान लागू करा- अनिलदादा जगताप

***रोजगार हमीतील गायगोठा अनुदान वाढीसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी***

बीड (प्रतिनिधी):- रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना गायगोठा बांधकामासाठी मंजूर असलेली रु. ८३,११४/- ही रक्कम अपुरी ठरत असल्याने शासन आदेशानुसार सुधारीत तरतूद लागू करून अनुदानवाढ द्यावी, अशी जोरदार मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. योजनेनुसार सध्या बीड मतदारसंघातील शेतकऱ्यांना गोठा बांधकामासाठी निश्चित रक्कम उपलब्ध होते. मात्र बांधकाम साहित्य, मजूरी आणि तांत्रिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे ही रक्कम काम पूर्ण करण्यास पुरेशी राहत नाही, असे जगताप यांनी निवेदनात नमूद केले आहे.



शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो-२०२०/प्र.क्र. ७०/रोहयो-७ मधील सुधारीत तरतूदीनुसार २ ते ६ गुरांसाठी एक गोठा आणि ६ पेक्षा अधिक गुरांसाठी ६ पटीने अनुदान देण्याची तरतूद स्पष्टपणे करण्यात आली आहे. १२ गुरांसाठी दुप्पट, १८ गुरांसाठी तिप्पट अनुदान देण्याची मुभा असून त्यापेक्षा पान २ वर...

# आवरगाव परिसरात धाडसी चोरी - मोटार रिवायडिंगचे दुकान फोडून १२ पंप लंपास

धारूर (प्रतिनिधी):- धारूर-आडस रोडवरील अवरगाव परिसरात मंगळवारी पहाटे अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. हसनाबाद पाटीजवळ असलेल्या सखाराम नखाते यांच्या 'नखाते मोटार रिवायडिंग' या दुकानाचे शटर उचकून चोरट्यांनी मोठी चोरी केली. ुकानात दुरुस्तीकरिता आलेले विहिरीतील ८ पंप तसेच बोअरमधील त४ प्रकारचे ४ पंप अशा एकूण १२ महागड्या पंपांची चोरी व मोटार रिवायडिंग साठी लागणारे वायर व इतर साहित्य अशी मोठी चोरी करण्यात झाली आहे. यात नखाते यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. चोरी पहाटेच्या सुमारास घडल्याचा अंदाज असून चोरट्यांनी दुकानी ठेवलेल्या वस्तूंची व्यवस्थित पाहणी करूनच ही चोरी केल्याचा अंदाज आहे. या घटनेनंतर



अवरगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक नागरिकांमध्ये असुरक्षिततेची पान २ वर...

# ग्रामपंचायत सेवकावर अमानवीय मारहाण ; पाय-हात फ्रॅक्चर

बीड (प्रतिनिधी):- गेवराई, ता. ८ डिसेंबर : गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे कोळी (एसटी) समाजाचे ग्रामपंचायत सेवक सुरवसे यांच्यावर काही इसमांनी कायदा हातात घेऊन मॉब लिचिंगसदृश अमानवीय मारहाण केल्याची गंभीर घटना घडली आहे. या मारहाणीत पीडित सुरवसे यांचे दोन्ही पाय व हात फ्रॅक्चर झाले असून पाय, डोके, हात व पाठीवर गंभीर मार लागल्याने त्यांच्यावर बीड येथील



सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू आहेत.या घटनेची माहिती मिळताच ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक भाई केदार यांनी तात्काळ बीड सिव्हिल रुग्णालय गाठले आणि पीडिताची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी त्यांनी बीडचे पोलिस अधीक्षक यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता, पोलिस अधीक्षकांनी पीडिताचा जबाब नोंदवून तात्काळ गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले.ऑल इंडिया पँथर सेनेने या प्रकरणी कठोर भूमिका घेतली पान २ वर...

# दिवसाढवळ्या दुकानात चोरी करणारी टोळी उघडकीस ;तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड (प्रतिनिधी):- दिनांक ०८/१२/२०२५ रोजी कोहिनूर जनरल स्टोअर्स, बीड येथे इमिटेशन ज्वेलरीची चोरी झाल्याची माहिती बीड शहर पोलिसांना प्राप्त झाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार चोरीमध्ये सहभागी असलेला रिक्षा चालक दिलशान खान पिता इस्माईल खान, वय ४३ वर्ष, रा. पडेगाव, छत्रपती संभाजीनगर यास चोरीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात पोलिसांना

यश आले. त्याच्याकडून अंदाजे ४०,००० रुपये किमतीची इमिटेशन ज्वेलरी तसेच अंदाजे २.५ लाख रुपये किमतीची रिक्षा असा एकूण ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपासात असे उघड झाले की मुख्य आरोपी दिलशान खान हा या टोळीचा प्रमुख असून तोच



छत्रपती संभाजीनगरहून चार बुर्खाधारी महिलांना घेऊन बीड शहरात चोरी करण्यासाठी आणत असे, गर्दीच्या वेळेत खरेदीच्या बहाण्याने दुकानात प्रवेश करून चोरी करणे आणि तत्काळ रिक्षाने परत निघून जाणे हीच त्यांची निश्चित पद्धत असल्याचे तपासात समोर आले आहे. चोरीमध्ये सहभागी असलेल्या चार बुर्खाधारी महिला आणि त्यांच्यासोबत असलेल्या आणखी एका इसमाचा पोलीस शोध घेत असून त्यांना अटक करणे बाकी आहे. पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. पूजा पवार आणि पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार बबन जाधव, शहेनशहा सय्यद, इलियास शेख, मंगेश शिंदे, रामेश्वर पवार आणि गहिनीनाथ बावनकर ,गोवर्धन सोनवणे यांनी केली आहे.

# प्रशासन हे कासव गतीने काम करत असून, ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या ठेवीदाराचे पैसे मिळतील का ? :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) मराठवाड्यातील चार लाखांपेक्षा जास्त ठेवीदारांचे चार ते पाच हजार कोटी पेक्षा जास्त पैसे बुडविणारे सुरेश कुटे ,अर्चना कुटे हे अटक असून सुद्धा प्रशासनाला त्यांच्या मालमत्ता कोण कोणत्या ठिकाणी आहेत, हे शोधायला वेळ का लागत आहे ? थोडी थोडी करून मालमत्ता जप्त करण्यामागे प्रशासनाचा काय हेतू आहे. एकदाच सर्व मालमत्ता जप्त का केल्या जात नाही. या अगोदर प्रशासनाने ८० ठिकाणच्या



मालमत्ता जप्त करून सुद्धा लिलाव केलेला नाही. आणि आता अजून २७ ठिकाणच्या मालमत्ता जप्त करून सुद्धा आतापर्यंत कमीत कमी न्यायालयाकडून लिलावासाठी पाठपुरावा सुद्धा केलेला नाही. त्यामुळे नागरिकाच्या मनात शंका निर्माण होत आहे की, दोन ते तीन वर्षाचा कालावधी होऊन सुद्धा प्रशासन हे कासव गतीने काम करत आहे. असे नागरिकाकडून बोलले जात आहे. कारण अजून पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT

CMYK